पुजा देखिता जाड जीवी गळालो ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो ॥ २० ॥
कितेकी देह त्यागिले तूजलागी ।
पुढे जाहले संगतीचे विभागी ॥
देहेदुःख होताचि वेगी पळालो ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो ॥ २१ ॥
किती योगमूर्ती किती पुण्यमूर्ती ।
किती धर्मसंस्थापना अन्नशांती ॥
पस्तावलो कावलो तप्त जालो ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो ॥ २२ ॥
सदा सर्वदा राम सोडूनि कामी ।
समर्था तुझे दास आम्ही निकामी ॥
बहु स्वार्थबुद्धीने रे कष्टवीलो ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो ॥ २३ ॥
नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान काही ।
नसे प्रेम हे राम विश्राम नाही ॥
असा दीन अज्ञान मी दास तूझा ।
समर्था जनीं घेतला भार माझा ॥ २४ ॥
उदासीन हे वृत्ति जीवी धरावी ।
अती आदरे सर्व सेवा करावी ॥
सदा प्रीति लागो तुझे गूण गाता ।
रघूनायका मागणे हेचि आता ॥ २५ ॥
सदा सर्वदा योग तूझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ॥
उपेक्षू नको गूणवंता अनंता ।
रघूनायका मागणे हेचि आता ॥ २६ ॥
नको द्रव्य-दारा नको येरझारा ।
नको मानसी ज्ञानगर्वे फुगारा ॥
सगूणी मना लावी रे भक्तिपंथा ।
रघूनायका मागणे हेचि आता ॥ २७ ॥
मनीं कामना कल्पना ते नसावी ।
कुबुद्धी कुडी वासना नीरसावी ॥
नको संशयो तोडि संसारव्यथा ।
रघूनायका मागणे हेचि आता ॥ २८ ॥
समर्थापुढे काय मागो कळेना ।
दुराशा मनीं बैसली हे ढळेना ॥
तुटो संशयो नीरसी सर्व चिंता ।
रघूनायका मागणे हेचि आता ॥ २९ ॥
ब्रिदाकारणे दीन हाती धरावे ।
म्हणे दास भक्तास रे उद्धरावे ॥
सुटे ब्रीद आम्हांसी सांडून जाता ।
रघूनायका मागणे हेचि आता ॥ ३० ॥
विश्रांति देही अणुमात्र नाही ।
कळाभिमाने पडिलो प्रवाही ॥
स्वहीत माझे होता दिसेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥ ३१ ॥
विषयी जनाने मज लाजवीले ।
प्रपंचसंगे आयुष्य गेले ॥
समयी बहु क्रोध शांती घडेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥ ३२ ॥
संसारसंगे बहु पीडलो रे ।
कारुण्यसिंधू मज सोडवी रे ॥
कृपाकटाक्षे सांभाळि दीना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥ ३३ ॥
आम्हां अनाथांसि तू एक दाता ।
संसारचिंता चुकवी समर्था ॥
दासा मनीं आठव वीसरेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥ ३४ ॥

॥ समाप्त ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥
श्रीसमर्थ रामदास स्वामिकृत

करुणाष्टके

अनुदिन अनुतापे तापलो रामराया ।
परमदिनदयाळा नीरसी मोहमाया ॥
अचपळ मन माझे नावरे आवरीता ।
तुजविण शिण होतो धाव रे धाव आता ॥१॥
भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजनजनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ॥
रघुपति मति माझी आपुलीशी करावी ।
सकळ त्यजुनि भावे कांस तूझी धरावी ॥२॥
विषयजनित सूखे सौख्य होणार नाही ।
तुजविण रघुनाथा ओखटे सर्व काही ॥
रविकुळटिळका रे हीत माझे करावे ।
दुरित दुरि हरावे स्वस्वरूपी भरावे ॥३॥
तनु-मन-धन माझे राघवा रूप तुझे ।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझे ॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचल भजनलीला लागली आस तूझी ॥४॥
चपळपण मनाचे मोडिता मोडवेना ।
सकळ स्वजनमाया तोडिता तोडवेना ॥
घडि घडि बिघडे हा निश्चयो अंतरीचा ।
म्हणवुनि करुणा हे बोलतो दीनवाचा ॥५॥
जळत हृदय माझे जन्म कोट्यानुकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटी ॥
तळमळ निववी रे राम कारुण्यसिंधू ।
षड्रिपुकुळ माझे तोडि याचा समंधू ॥६॥
तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
शिणत शिणत पोटी लागली आस तूझी ॥
झडकरि झड घाली धाव पंचानना रे ।
तुजविण मज नेती जंबुकी वासना रे ॥७॥
सबळ जनक माझा राम लावण्यकोटी ।
म्हणवुनि मज पोटी लागली आस मोठी ॥
दिवसागणित बोटी ठेवूनि प्राण कंठी ।
अवचट मज भेटी होत घालीन मीठी ॥८॥
जननिजनकमाया लेकरू काय जाणे ।
पय न लगत मूखी हाणिता वत्स नेणे ॥
जळधरकणआशा लागली चातकासी ।
हिमकर अवलोकी पक्षिया भूमिवासी ॥९॥
तुजविण मज तैसे जाहले देवराया ।
विलग विषमकाळी तूटली सर्व माया ॥
सकळजनसखा तू स्वामि आणीक नाही ।
वमकवमन जैसे त्यागिले सर्व काही ॥१०॥
स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आता चित्त कोठे न राहे ॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि जाती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥११॥
सकळ जन भवाचि आथिले वैभवाचे ।
जिवलग मग कैचे चालते हेचि साचे ॥
विलग विषमकाळी सांडिती सर्व माळी ।
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळी ॥१२॥
सुख सुख म्हणता हे दुःख टाकूनि आले ।
भजन सकळ गेले चित्त दुश्चीत जाले ॥
भ्रमित मन कळेना हीत ते आकळेना ।
परम कठिण देही देहबुद्धि वळेना ॥१३॥
उपरति मज रामी जाहली पूर्णकामी ।
सकळभ्रमविरामी राम विश्रामधामी ॥
घडिघडि मन आता रामरूपी भरावे ।
रघुकुळटिळका रे आपुलेसे करावे ॥१४॥
जलचर जळवासी नेणती त्या जळासी ।
निशिदिन तुजपाशी चूकलो गूणरासी ॥
भुमिधर निगमासी वर्णवेना जयासी ।
सकळभुवनवासी भेट दे रामदासी ॥१५॥
असंख्यात ते भक्त होऊनि गेले ।
तिन्ही साधनांचे बहू कष्ट केले ॥
नव्हे कार्यकर्ता भुमीभार जालो ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो ॥१६॥
बहू दास ते तापसी तीर्थवासी ।
गिरीकंदरी भेट नाही जनांसी ॥
स्थिती ऐकता थोर विस्मीत जालो ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो ॥१७॥
सदा प्रेमराशी तया भेटलासी ।
तुझ्या दर्शने स्पर्शने सौख्यराशी ॥
अहंता मनीं शब्दज्ञाने बुडालो ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो ॥१८॥
तुझ्या प्रीतिचे दास जन्मास आले ।
असंख्यात ते कीर्ति बोलोनि गेले ॥
बहू घोरणा थोर चक्कीत जालो ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो ॥१९॥
बहूसाल देवालये हाटकाची ।
रसाळा कळा लाघवे नाटकाची ॥